महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
**(महाराष्ट्र शासन अंगीकृत)**
**CIN : U40109MH2005SGC153645**
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५/१७२६०
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला
धारावी रोड, माटुंगा, मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.
**दि. ३० / ०७ / २०२१**

# परिपत्रक

**विषय : सन २०२१ करीता बदली धोरण राबविण्याबाबत.**

**संदर्भ :** १. महावितरण बदली धोरण तथा प्रशासकीय परिपत्रक क्र. ५१४ दि. १०.०८.२०१५.
२. प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०७ दि. ०७.०८.२०२०.
३. शासन निर्णय क्र. क्र.एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.२०/कार्या.१२ दि. २९.०७.२०२१.

कंपनी अंतर्गत प्रशासकीय परिपत्रक क्र. ५१४ दि. १०.०८.२०१५ अन्वये बदली धोरण स्विकारण्यात आले आहे, सद्यस्थितीत महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.कार्या.१२ दि. ०९.०७.२०२१ अन्वये निर्गमित केलेल्या सुचनांनुसार तसेच कोवीड संक्रमणामुळे उदभवलेली परिस्थिती व कंपनीच्या कठीण आर्थिक समस्येमुळे खर्चात काटकसर करण्याच्या उद्देशाने अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (वाणिज्य), संचालक (प्रकल्प) आणि संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करून दिलेल्या मंजुरीनुसार, कंपनीअंतर्गत सन २०२१ मध्ये अत्यावश्यक तेवढयाच बदल्या करण्या करिता धोरण राबविण्याकरीता खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत:

i) दि. ३०.०६.२०२१ पर्यंत सादर करण्यात आलेले विनंती अर्ज बदलीसाठी विचारात घेण्यात यावेत.

**ii) प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०७ दि. ०७.०८.२०२० मधील गट-१ ते ४ नुसार विहीत करण्यात आलेले निकष विनंती बदल्यांकरीता विचारात घेण्यात यावेत.**

**iii) गट १ मधील कारणांव्यतिरिक्त इतर सर्व विनंती बदली करीता कर्मचाऱ्यांने सध्याच्या ठिकाणी कमीतकमी २ वर्षांचा कालावधी दि. ३०.०६.२०२१ रोजी पूर्ण केलेला असणे आवश्यक राहील.**

iv) सांघिक कार्यालयाकडून आंतर परिमंडळीय प्रशासकिय व विनंती बदल्यांचे आदेश निर्गमित करण्यात येतील. तसेच परिमंडळ / मंडळ / विभाग अंतर्गतच्या बदल्या संबंधित कार्यालये करतील.

**v)** परिमंडल व इतर कनिष्ठ कार्यालये यांनी त्यांच्या स्तरावरील बदल्यांबाबतची कार्यवाही **दि. ०७.०८.२०२१** रोजी पूर्ण करावी व पदनिहाय बदलीचा अहवाल मुख्य कार्यालयास सादर करावा. याकरिता त्यांनी सांघिक कार्यालयाची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत थांबण्याची आवश्यकता नाही. **परिमंडल स्तरावरून करण्यात येणाऱ्या एकूण बदल्या कार्यरत कर्मचारी संख्येच्या १५% मर्यादेपर्यंतच राहतील.** त्यापैकी सर्वसाधारण बदल्या आणि विनंती बदल्या समप्रमाणात असतील. प्रशासकिय बदल्या जर कमी झाल्या तर उर्वरित वाढ विनंती बदल्यात करण्यात यावी. **सर्वसाधारण बदल्या करतांना प्रशासकिय परिपत्रक क्र. ५१४ दि. १०.०८.२०१५ मधील बदली धोरणाचा मुद्दा क्र. २ याची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.**

**vi)** एकाच ठिकाणी/ मुख्यालयात दिर्घ कालावधी पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांची बदली करण्यात यावी. याबाबत संबंधित ठिकाणावरील कालावधीनुसार ज्येष्ठ असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा बदलीसाठी प्रथम विचार करण्यात यावा. संबंधित ठिकाणावरील कालावधीची गणना करीत असतांना **दि. ३०.०६.२०२१** रोजीपर्यंतचा कालावधी ग्राहय धरण्यात यावा.

vii) **परिमंडळ व इतर कनिष्ठ कार्यालयानी त्यांच्या स्तरावर बदल्या करताना त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये रिक्त पदांचा असमतोल होणार नाही याची दक्षता घ्यावी.**

viii) कोणत्याही विनंती बदली प्रकरणी भत्ते व बदली अनुदान देय असणार नाही. तथापि, प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना सदरचे लाभ विद्यमान नियमांनुसार देय असतील.

ix) सन २०२० मध्ये जाहिर करण्यात आलेली अनिवार्य रिक्त पदे (Compulsory Vacancy- **CV**) सन २०२१ मध्ये देखील तशाच कायम राहतील.

x) सर्व बदल्या संदर्भ क्र. ३ मधील शासन निर्णयात विहित केलेल्या कालमर्यादेनुसार पुर्ण कराव्यात.

xi) सर्व सहाय्यक व प्रशिक्षणार्थी (GET & DET) यांची फक्त गट १ मधील कारणांसाठी विनंती बदली करण्यात यावी.

xii) एखाद्या पदावरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची, उपरोक्त कारणाव्यतिरिक्त अन्यत्र बदली करुन अशा पदावर सर्वसाधारण / विनंती बदली करता येणार नाही.

३. प्रशासकीय परिपत्रक क्र. ५१४ दि. १०.०८.२०१५, प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०७ दि. ०७.०८.२०२० आणि पत्र क्र.मासंवि/रवका/न.क्र.५/बदली धोरण/१३७४२ दि.२७.०८.२०२० मधील अन्य तरतुदी अपरिवर्तीत राहतील. सर्व सक्षम अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, सन २०२१ मध्ये अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या करीत असतांना बदली विषयक लागू करण्यात आलेल्या उपरोक्त सुधारीत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

**सोबत :** शासन निर्णय दि.२९.०७.२०२१.

30/7/21

**(भालचंद्र खंडाईत )**
**संचालक (मासं)**

**प्रत सस्नेह सादर :**

१) संचालक (वित्त)/ (संचलन)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत रवाना :**

१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.
३) कार्यकारी संचालक (मासं) (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)
५) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (मासं)/ मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
६) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.
७) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.
८) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
९) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.
१०) मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्य अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर सन २०२१-२२ या चालू आर्थिक वर्षातील बदल्यांसंदर्भात करावयाच्या कार्यवाही बाबतच्या सूचना..**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही -२०२१/प्र.क्र.२० /कार्या १२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २९ जुलै, २०२१

**संदर्भ:-**

१. "महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५."
२. सामांन्य प्रशासन विभागाचा समक्रमांकाचा दिनांक १० मे,२०२१ चा शासन निर्णय
३. सामान्य प्रशासन विभागाचा समक्रमांकाचा दिनांक ९ जुलै,२०२१ चा शासन निर्णय

**शासन निर्णय : -**

संदर्भाधीन क्रमांक ३ च्या शासन निर्णयाद्वारे राज्यात कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव अद्याप आटोक्यात आला नसल्याने तसेच या प्रादुर्भावाच्या तिसऱ्या लाटेची शक्यता विचारात घेऊन, सन २०२१-२२ या चालू आर्थिक वर्षी मर्यादित स्वरुपात दिनांक १४ ऑगस्ट २०२१ पर्यंत बदल्या करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. सदर शासन निर्णय रद्द करण्यात येत असून, या शासन निर्णयाद्वारे सन २०२१-२२ या चालू आर्थिक वर्षी करावयाच्या बदल्यांसंदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) सद्यस्थितीत, महाराष्ट्र हे कोरोनाबाधित राज्य असल्यामुळे व तिसऱ्या लाटेची संभाव्य शक्यता विचारात घेता, तसेच कोविड-१९ या विषाणूमुळे उद्भवलेली महामारी व त्या अनुषंगाने घालण्यात आलेले अनेक निर्बंध यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला असल्यामुळे बदली भत्त्यावरील खर्च मर्यादित स्वरुपात करण्याच्या दृष्टीने, **सर्वसाधारण बदल्या या एकूण कार्यरत पदांच्या २५ टक्के एवढया मर्यादेत, बदली अधिनियमातील कलम ६ मध्ये नमूद केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करण्यात याव्यात.**

२) २५ टक्के मर्यादेत सर्वसाधारणा बदल्या करत असताना, संबंधित पदावर विहित कालावधी पूर्ण झालेल्या सर्व पात्र अधिकारी/कर्मचारी यांच्यापैकी ज्यांचा संबंधित पदावर जास्त कालावधी पूर्ण झाला आहे अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांची प्राधान्याने बदली करण्यात यावी.

३) **सर्वप्रथम सर्वसाधारण बदल्यांची कार्यवाही दि. ९ ऑगस्ट, २०२१ पर्यंत पूर्ण करण्यात यावी.**

४) सर्वसाधारण बदल्यांची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच, जी पदे रिक्त राहतील केवळ अशा रिक्त पदांवरच **विशेष कारणास्तव बदल्या दि.१० ऑगस्ट, २०२१ ते दि. ३० ऑगस्ट, २०२१ या कालावधीपर्यंत अनुज्ञेय राहतील.** सबब, जे पद रिक्त नाही अशा पदावरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची अन्यत्र बदली करुन अशा पदावर विशेष कारणास्तव बदली करता येणार नाही.

५) बदली अधिनियमातील कलम ४ (४) नुसार विशेष कारणांमुळे बदली करणे आवश्यक असल्याची सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल अशा बाबतीत तसे **लेखी कारण नमूद केल्यानंतरच अशा विशेष कारणास्तव करावयाच्या बदल्या करण्यात याव्यात.**

Scanned by CamScanner

६) तसेच, विशेष कारणास्तव करावयाच्या बदल्या या बदली अधिनियमातील कलम ४ (५) नुसार कलम ६ मध्ये नमूद केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या लगतच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करण्यात याव्यात.

७) विशेष कारणास्तव करावयाच्या बदल्या या एकूण कार्यरत पदांच्या १० टक्केपर्यंत एवढया मर्यादेतच करण्यात याव्यात.

८) सर्वसाधारण बदल्या तसेच विशेष कारणास्तव बदल्या करताना नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी प्राप्त करण्याची व बदली अधिनियमातील सर्व तरतूदींचे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

९) ज्या विभागांमध्ये बदलींची कार्यवाही करण्यासाठी संगणकीय प्रणाली (ऑनलाईन) पुर्णतः किंवा अंशतः विकसित केली आहे, अशा विभागांनी सदर प्रणालीचा वापर करावा. तसेच, ज्या विभागांनी सदर प्रणाली विकसित केली नाही त्यांनी भविष्यात ही प्रणाली विकसित करावी.

१०) सर्वसाधारण बदल्या तसेच विशेष कारणास्तव बदल्यांचे आदेश निर्गमित केल्यानंतर, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमानुसार दिलेल्या पदग्रहण अवधीतच, बदली झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांने बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन ( dies non ) म्हणून गणला जाईल.

११) **उपरोक्त नमूद सूचनांनुसार करावयाची कार्यवाही ही दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात यावी.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०७२९१६०९४२५५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Geeta Rahul Kulkarni

Department, postalCode=400032, st=Maharashtra,
Date: 2021.07.29 16:16:22 +05'30'

( गीता रा. कुलकर्णी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
६. सर्व मा. संसद सदस्य/विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
७. मा.मुख्य सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
९. सर्व विभागीय आयुक्त,



Scanned by CamScanner